महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय

क्रमांक: तक्रार/मशंजा/ससंअ/२०२५/प्र.क्र.१८३/प्रशा-२/४४७    दिनांक: २७/०५/२०२६

**परिपत्रक**

**विषय : संगणकावरील माहिती जतन करण्याबाबत.**

अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयातील अधिकारी / कर्मचारी पदावरुन कार्यमुक्त होताना संगणकावरील माहिती नष्ट करत असल्याचे व व्यक्तिगतरित्या जतन करत असल्याचे आढळून आले आहे. शासकीय संगणकावरील कार्यालयीन माहिती ही शासनाची मालमत्ता आहे. आदेशाशिवाय शासकीय माहिती सार्वजनिक करणे, शासकीय माहिती व्यक्तिगतरित्या जतन करणे ह्या बाबी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार नियम ३ चा भंग करणाऱ्या आहेत.

२. अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यमुक्त करतेवेळी संगणकावरील डेटा योग्य प्रकारे जतन व हस्तांतरीत करण्यात आला आहे, याची संबंधित अधिकाऱ्यांनी खात्री करावी. संगणकावरील माहिती नष्ट करणे, कार्यमुक्त होताना कार्यभार घेणाऱ्या कर्मचाऱ्याकडे हस्तांतरीत न करणे ही बाब गंभीर आहे. अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, शासकीय संगणकावरील डेटा, माहिती तसेच कार्यालयातील सर्व नस्त्या (Files) ही शासनाची मालमत्ता असल्याने, कोणतीही माहिती व नस्ती नष्ट न करता किंवा अनधिकृतपणे वैयक्तिकरित्या जतन न करता, कार्यमुक्त होताना ती नवीन कार्यभार स्वीकारणाऱ्या व्यक्तीकडे पूर्णतः हस्तांतरित करणे अनिवार्य आहे. यामध्ये कोणतीही कसूर किंवा अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार कठोर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(कृ. व. फिरके)
विशेष आयुक्त,
अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई.

प्रति,
अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाचे सर्व अधिकारी / कर्मचारी.

प्रत :
१. मा. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी, मुंबई यांचे स्वीय सहायक.
२. विशेष आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
३. अतिरिक्त आयुक्त (सर्व), अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई.
४. सह आयुक्त (सर्व), अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणून देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.
५. सह आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, प्रादेशिक कार्यालय, (सर्व) यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणून देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.
६. उप आयुक्त (सर्व), अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निर्देशनास आणून देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात यावी.
७. निवडनस्ती.

प्रशासकीय इमारत, ८ वा मजला,मुंबई उपनगर जिल्हा,शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.